सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.
श्रीम. स्नेहाली सु. साळवी, लेखाधिकारी.

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
शासन आदेश:-संलेको-२०२५/प्र.क्र.१५/कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १०.०२.२०२५.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
12 FEB 2025
प्राप्त क्र

संदर्भ :- १) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको /प्रशा-राप/का ६/ स्ने. सं.साळवी/१०.२४/१३०४/१००१/४४०२, दि.२१.१०.२०२४,
२) जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश क्र.२०२२/पुरवठा/आस्था/ आकृ.प.मृ./कार्य/कावी-७७६, दि.०३.०८.२०२२
३) सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश जा.क्र.प्रशा-४/सहसंलेको/ औ.बाद/प्रशा-४/श्रीमती साळवी/२०२२/२१२५,दि.०६.०९.२०२२,
४) शासन वित्त विभाग आदेश क्र. संलेको-२०२२/प्र.क्र.१३०/कोषा प्रशा-२,दि.०९.०२.२०२३,
५) सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश जा.क्र.प्रशा-४/सहसंलेको/ औरंगाबाद/श्रीम.साळवी/२०२३/४३३,दि.१७.०२.२०२३,
६) शासन वित्त विभाग आदेश क्र.संलेको-२०२२/प्र.क्र.१५७/कोषा प्रशा-२,दि.०६.०९.२०२३,
७) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, नवी मुंबई यांचे पत्र क्र. प्रा.उ.स.क./आस्था/श्रीम. साळवी/२०२३-२४/२४४२, दि.१२.०९.२०२३,
८) शासन वित्त विभाग आदेश क्र.संलेको-२०२५/प्र.क्र./कोषा प्रशा-२, दि.१०.०२.२०२५.

55

**-: शासन आदेश :-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील श्रीमती स्नेहाली सुरेंद्र साळवी, लेखा अधिकारी ह्या जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा विभाग) छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असतांना जिल्हाधिकारी पुरवठा विभागातील लेखा अधिकारी हे पद मृत घोषित करण्यात आल्याने संदर्भ क्र.२ अन्वये श्रीमती साळवी यांना दि.०३.०८.२०२२ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

२. शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ मधील तरतूदीनुसार श्रीमती साळवी ह्या पदस्थानेच्या प्रतिक्षेत संदर्भ क्र.३ अन्वये दि.०४.०८.२०२२ (म.पू.) रोजी सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात हजर झाल्या असून श्रीमती साळवी यांची सेवा उपयोगात आणणे आवश्यक असल्याने त्यांचेकडे कार्यालयातील अन्य शाखेचे कामकाज सोपविण्यात आले.

३. श्रीमती साळवी ह्या पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असतांना शासन वित्त विभाग यांच्या संदर्भ क्र.४ दि.०९.०२.२०२३ रोजीचे आदेशान्वये त्यांना लेखा अधिकारी, जलजीवन मिशन, हिंगोली या पदावर पदस्थापना देण्यात आली.

४. श्रीमती साळवी यांना पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी संदर्भ क्र.५, दि.१७.०२.२०२३ (म.नं.) रोजी सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातून कार्यमुक्त करण्यात आले. तथापि, वैद्यकीय कारणास्तव श्रीमती साळवी ह्या सदर पदसथापनेच्या पदावर हजर झाल्या नाहीत.

५. शासन वित्त विभाग, संदर्भ क्र.६ दि.०६.०९.२०२३ रोजीचे आदेशान्वये श्रीमती साळवी, लेखा अधिकारी यांना विभागीय समाजकल्याण अधिकारी यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई येथे देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या पदावर श्रीमती साळवी ह्या संदर्भ क्र. ७ अन्वये दि.११.०९.२०२३ (म.पू.) रोजी रुजू झालेल्या आहेत.

00187/2025/236
12.02.2025



13/02/25

६. श्रीमती साळवी, लेखाधिकारी यांची संदर्भ क्र.८ च्या आदेशान्वये दि.१८.०२.२०२३ ते दि.०८.०९.२०२३ पर्यंत २०३ दिवसांची रजा मंजूर करण्यात आलेली आहे.

७. श्रीमती साळवी यांचा नियमित करावयाचा प्रतिक्षाधीन कालावधी पुढीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | रजेचा कालावधी | रजेचे दिवस | नियमित करावयाचा प्रतिक्षाधिन कालावधी |
|---|---|---|---|
| १ | दि.०४.०८.२०२२ ते दि.१७.०२.२०२३ | १९८ दिवस | नियमित करावयाचा प्रतिक्षाधिन कालावधी |

८. यास्तव, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण सेवाशर्ती) नियम, १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) मधील तरतूदींच्या अधीन राहून लेखाधिकारी संवर्गातील श्रीमती साळवी यांच्या दि.०४.०८.२०२२ ते दि.१७.०२.२०२३ पर्यंत १९८ दिवस नियमित करावयाच्या प्रतिक्षाधीन कालावधीचे (रजा कालावधीसह) व लगतनंतर दि.१८.०२.२०२३ ते दि.०८.०९.२०२३ या २०३ दिवस मंजूर रजा कालावधीचे (साप्ताहिक सुट्ट्यांसह) वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता आहरण व संवितरण अधिकारी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, नवी मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ता.र.पवार)**
**अवर सचिव, वित्त विभाग.**

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५) आहरण व संवितरण अधिकारी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, नवी मुंबई,*
६) श्रीमती स्नेहाली सुरेंद्र साळवी, लेखाधिकारी *
७) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
८) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,
*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)